# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांक:25.05.2024** **वार:शनिवार**

---

1. लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यातल्या 58 लोकसभा मतदारसंघात मतदानाला प्रारंभ
2. येत्या 10 वर्षात भारताची अर्थव्यवस्था 10 ट्रिलियन डॉलरची असेल, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांचं प्रतिपादन
3. दक्षिण कोरियातल्या तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेत टर्कीला नमवत भारतीय महिला संघाला सुवर्णपदक आणि
4. पंजाब, हरियाणा, राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेशच्या पश्चिम भागात पाच दिवस उष्णतेची तीव्र लाट येण्याचा अंदाज तर आसाममध्ये शाळांच्या वेळात बदल

**<u>मतदान</u>**

लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यातील 58 लोकसभा मतदारसंघात आज सकाळी 7 वाजता मतदान सुरू झालं आहे. या टप्प्यात बिहार लोकसभेच्या 8 जागांसाठी, हरियाणातील सर्व 10, झारखंडमधील 4, दिल्लीतील सर्व 7, ओडिशातील 6, उत्तर प्रदेशातील 14, पश्चिम बंगालमधील 8 जागा आणि जम्मू-काश्मीर मधील एका जागेसाठी मतदान होत आहे. या टप्प्यात 11 कोटी 13 लाखांहून अधिक पात्र मतदार 1 लाख 14 हजार मतदान केंद्रांवर मतदान करतील. दिल्ली, गुडगाव आणि फरिदाबाद सारख्या भागात मतदारांना, शहरी उदासीनतेची वृत्ती मोडून मतदानाचा हक्क बजावण्याची खास आठवण निवडणूक आयोगानं करून दिली असल्याची माहिती; आमच्या वार्ताहरानं  दिली आहे. एकूण 257 आंतरराष्ट्रीय सीमा तपासणी नाके आणि 927 आंतरराज्य सीमा तपासणी नाके यांच्यावर दारू, ड्रग्ज, रोख रक्कम आणि मोफत वस्तूंच्या कोणत्याही अवैध वाहतुकीवर तसंच सागरी आणि हवाई मार्गांवरही कडक पाळत ठेवण्यात आली आहे.

**<u>सर्वोच्च न्यायालय -मतदार</u>**

लोकसभा निवडणुकीदरम्यान मतदान केंद्रनिहाय मतदानाची टक्केवारी संकेत स्थळावर जाहीर करण्याच्या याचिकेवर निवडणूक आयोगाला निर्देश देण्याकरता सर्वोच्च न्यायालयानं काल नकार दिला. सध्या सुरू असलेल्या निवडणूक प्रक्रियेत हस्तक्षेप करण्याची भूमिका घेऊ नये असंही याचिकेत म्हटलं होतं. न्यायमूर्ती दीपंकर दत्ता आणि न्यायमूर्ती सतीश चंद्र शर्मा यांच्या खंडपीठाने या अर्जावरील सुनावणी पुढे ढकलली आणि लोकसभा निवडणुका झाल्यानंतरच त्यावर सुनावणी होईल, असं सांगितलं.

**<u>बीएसएफ- अजित डोभाल</u>**

भारत अतिशय वेगानं बदलत असून येत्या 10 वर्षात आपली अर्थव्यवस्था 10 ट्रिलियन डॉलरची असेल असं राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांनी म्हटलं आहे. भारत जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनेल; आणि भारताकडे जगातील सर्वात मोठी कार्यशक्तिही असेल असंही ते म्हणाले. नवी दिल्लीतील विज्ञान भवन इथे सीमा सुरक्षा दल म्हणजे बीएसएफच्या 21 व्या स्थापना समारंभाच्या रुस्तमजी स्मृती व्याख्यानमालेत डोभाल बोलत होते. भारत तांत्रिकदृष्ट्या सेमीकंडक्टर, कृत्रिम बुद्धिमत्ता, उत्पादन, संरक्षण आणि सुरक्षा यासह अनेक क्षेत्रात सर्वात प्रगत देश ठरेल असं डोभाल यांनी सांगितलं. देशाच्या सीमा सुरक्षित करण्यात बीएसएफच्या योगदानाचं त्यांनी कौतुक केलं. आधुनिक आव्हानांना तोंड देण्यासाठी बीएसएफ सातत्यानं प्रयत्नशील असल्याचं बीएसएफचे महासंचालक नितीन अग्रवाल यांनी या कार्यक्रमात बोलताना सांगितलं. सीमा सुरक्षेसोबतच, बीएसएफने सद्भावना निर्माण करण्यासाठी आणि सीमेवरील लोकांचा विश्वास संपादन करण्यासाठी वैद्यकीय

शिबिरं आणि क्रीडा स्पर्धा असे अनेक कार्यक्रम सुरू केले आहेत. 2023 मध्ये पाकिस्तानने पाठवलेले 107 ड्रोन बीएसएफने पाडले असल्याची माहिती त्यांनी दिली.

**डीडी-किसान-एआय**

दूरदर्शन वरील DD KISAN ही वाहिनी आता ए आय क्रिश आणि ए आय भूमी या वृत्त निवेदकांमुळे कृत्रीम बुद्धिमत्ता अर्थात एआय प्रणाली वापर करणारी देशातील पहिली सरकारी दूरदर्शन वाहिनी ठरणार आहे. कृषी मंत्रालयानं दिलेल्या महितीनुसार डीडी किसान ही वाहिनी उद्यापासून देशातील शेतकऱ्यांसाठी एका  नव्या रूपात आणि एका नव्या शैलीसह सादर होणार आहे. हे नवीन एआय वृत्तनिवेदक पन्नास भाषांमध्ये आणि अथकपणे 24 तास 365 दिवस वृत्त निवेदन करू शकणार आहेत. हे AI वृत्त निवेदक देशातील आणि जागतिक स्तरावरील कृषी संशोधन, कृषी बाजारातील कल, हवामानातील बदल आणि सरकारी योजनांबाबत आवश्यक माहिती देतील.

**रामेश्वरम स्फोट**

मार्च महिन्यात झालेल्या रामेश्वरम कॅफे स्फोट प्रकरणी राष्ट्रीय तपास संस्थेनं आणखी एका आरोपीला अटक केली आहे. शोएब अहमद मिर्झा असं त्याचं नाव असून तो कर्नाटक राज्यातील हुबळीचा रहिवासी आहे. यापूर्वी लष्कर-ए-तैयबाच्या अतिरेकी कट खटल्यातही तो दोषी आढळला होता. ती शिक्षा भोगून तुरुंगातून बाहेर पडल्यानंतर या नवीन गुन्हात तो सहभागी झाला असल्याचं तपास संस्थेनं सांगितलं. स्फोट प्रकरणी आतापर्यंत तपास संस्थेनं देशभरातील 29 जागांवर सखोल तपास मोहीम राबवत पाच आरोपींना अटक केली आहे.

**एनडीए**

राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या 146 व्या तुकडीचा दिमाखदार दीक्षांत संचलन सोहळा लष्कर प्रमुख जनरल मनोज पांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत काल पुण्यात पार पडला. या संचलनात महिला छात्रांच्या तुकडीचाही समावेश होता. या देशात आता संरक्षण क्षेत्रात नारीशक्तीचं मजबूत स्थान असल्याचं लष्करप्रमुख म्हणाले. आधुनिक काळात युद्धाचं स्वरूप बदलत आहे; पारंपरिक युद्धात आता तंत्रज्ञान, अंतराळ आणि माहिती तंत्रज्ञानाचाही समावेश झाला आहे. त्यामुळे अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेबाबत अद्ययावत असलं पाहिजे, अशी अपेक्षा लष्करप्रमुखांनी व्यक्त केली. यावेळी शोभित गुप्ता याला सुवर्ण, माणिक तरुण याला रौप्य तर अन्नी नेहरा याला कास्यपदक देऊन गौरवण्यात आलं आणि मानाचा चीफ ऑफ स्टाफ बॅनर गोल्फ स्क्वॉड्रनला देण्यात आला. 146 व्या तुकडीत 337 छात्र सहभागी होते.

**कान्स पुरस्कार**

भारतीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्था एफटीआयआयचे विद्यार्थी चिदानंद नाईक आणि त्याच्या चमूने  तयार केलेल्या 'Sunflowers were the first ones to know' या लघुपटाला 77व्या कान चित्रपट महोत्सवात 'ल सिनेफ' पुरस्कार मिळाला आहे. FTII च्या दूरचित्रवाणी गटाच्या सुरज ठाकूर यांनी या चित्रपटासाठी कॅमेरा संयोजन, मनोज व्ही यांनी संपादन तर ध्वनी संयोजन अभिषेक कदम यांनी केलं. भारतीय चित्रपटांसाठी हा अभिमानाचा क्षण असल्याचं माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं म्हटलं आहे. गेल्या काही वर्षांपासून FTIIनं आपल्या विद्यार्थ्यांच्या कलाकृतींच्या माध्यमातून कान्स महोत्सवात लक्षणीय कामगिरी केली आहे. याआधी, चार वर्षांपूर्वी, 73 व्या कान महोत्सवात FTII च्या विद्यार्थ्याला कॅटडॉग या चित्रपटासाठी पुरस्कार मिळाला होता.

**तिरंदाजी विश्वचषक**

दक्षिण कोरियातल्या येनचेऑन इथं सुरू असलेल्या तिरंदाजी विश्वचषक स्पर्धे स्टेज टूच्या महिलांच्या मिश्र सांघिक गटात ज्योती सुरेखा वेन्नम, परणीत कौर आणि आदिती स्वामी या खेळाडूंनी टर्की च्या संघाला नामवंत सांघिक सुवर्णपदक पटकावलं. जगातील अव्वल स्थानावर असलेलया या भारतीय संघानं टर्कीच्या संघाचा सहा गुणांच्या फरकानं पराभव केला. हा विजय प्राप्त करत ज्योती, परणीत आणि विश्व विजेती खेळाडू आदितीच्या या संघानं विश्वचषकावर मोहोर उमटवण्याची हॅटट्रिक साधली आहे.

**<u>पश्चिम बंगाल वादळ</u>**

बंगालच्या उपासगरावर तयार झालेला कमी दाबाचा पट्टा गेल्या काही तासात उत्तर-ईशान्य भागाकडे ताशी 8 किलोमीटर वेगाने पुढे सरकला असून बंगालच्या उपसागरातील मध्य पूर्व भागात स्थिरावला आहे. आज बंगालच्या उपसागरात त्याचं चक्रीवादळात रूपांतर होण्याचा अंदाज आहे. उद्या रात्रीपर्यंत हे वादळ उत्तरकडे सरकत अती तीव्र रूप धारण करेल. यावेळी चक्रीवादळामध्ये ताशी 110 ते 130 किलोमीटर वेगाने वारे वाहतील असा अंदाज आहे.

**<u>उष्णतेची लाट</u>**

भारतीय हवामान खात्याने पंजाब, हरियाणा, राजस्थान, गुजरात आणि मध्य प्रदेशच्या पश्चिम भागात पुढील पाच दिवस उष्णतेची तीव्र लाट येणार असल्याचा अंदाज वर्तवला आहे. या भागावर कुठल्याही प्रकारे वादळी वारे वाहण्याची स्थिति तयार होणार नसल्याने लोकांना या उष्णतेच्या लाटेचा सामना करावा लागेल असं भारतीय हवामान खात्याचे जेष्ठ शास्त्रज्ञ आर के जेनामणी यांनी आकाशवाणीला सांगितलं. तापमान सातत्यानं 44 ते 48 अंश सेल्सियसच्या दरम्यान राहील त्यामुळे उष्णताप्रवण क्षेत्रात धोक्याचा लाल आणि नारंगी बावटा दाखवण्यात आला आहे. मध्य प्रदेशात होरपळून टाकणारी उष्णतेची लाट कायम असून अनेक जिल्हे तीव्र उष्णतेचा सामना करत आहेत. चंबळसह माळव्याच्या अनेक भागात तापमान 44 ते 46 अंशाच्या वर गेलं आहे. भोपाळ, इंदूर आणि ग्वाल्हेर मधील नागरीक उष्णतेमुळे बेजार झाले आहेत.

**<u>आसाम उष्णतेची लाट</u>**

आसाम राज्यातील कामरूपसह बहुतांश जिल्ह्यात उष्णतेची लाट सदृश्य वातावरण झाल्यानं तिथल्या जिल्हा प्रशासनानी विद्यार्थ्यांचं आरोग्य हित लक्षात घेत शाळांच्या वेळेत बदल केला आहे. गेल्या आठवड्यापासून वातावरणात वाढलेल्या उष्णतेमुळे मुलांमध्ये डोकेदुखी, घामाघूम होणे आणि इतर आरोग्य समस्या निर्माण होऊ शकतात हे लक्षात घेत, मुलांच्या आरोग्याला कुठल्याही प्रकारची गंभीर इजा पोहोचू नये यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचं प्रशासनानी सांगितलं आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार